# माहिती आणि ज्ञान यातील फरक आणि फारकत

मला जेव्हा कळलं की मला पुस्कातून ज्ञान मिळालं नाही, मिळाली ती माहिती, तेव्हा मला प्रचंड धक्काच बसला, मी स्वत:लाच विचारलं, असं कसं झाल ? असं का झालं ? नाही, नाही मला ज्ञान मिळवायचं होतं, माहिती नव्हे .

महिती आणि ज्ञान यात फरक आहे हे मात्र मला तेव्हाच अवगत झालं जेव्हा मी माझ्या नकळतच ज्ञान मिळवत होते. आज सर्व शाळांमधून व महाविद्यालयांमधून सुध्दा दिल्या व घेतल्या जाते ती फक्त माहितीच. मग या शैक्षणिक संस्था ज्ञान प्रदान नाही का करू शकणार ? नक्कीच करू शकतील. जेव्हा ज्ञान हवं ही जाणीव होईल व तशी मागणी येईल तेव्हाच. पण मुळात ज्ञान व माहिती यातील फरक समजेल तेव्हाच हे परिवर्तन दिसेल.

माहिती मिळते ती पुस्तकातून, इंटरनेट व्दारे, संगणक व दूरदर्शन व्दारे, बरेचदा माहिती परस्पर विरोधीही मिळते. खूपदा माहिती गोंधळात टाकते. जी आपण विसरतो ती माहिती. जो माहिती संबंधी काम करतो तो असतो कारकून, आज कुणालाही कारकून बनायचं नाही. मग एवढ्या माहितीच्या का मागे जाता? ज्ञान मिळवा. माहितीचा संगणकाद्वारे स्फोट झालाय्. घ्या किती घेता ती ! खूप माहिती तुमची मतीच गुंगवून टाकील. तुम्हाला प्रश्न पडेल इतक्या माहितीचं मी काय करू ? एक असाही गैरसमज दिसतो की खूप माहिती घेतली की माणूस ज्ञानी होतो. छे ! त्याला पढतमूर्ख म्हटलंय्, बरेचदा यातून निर्माण होते ती नकारात्मकता.

मला या क्विझ मध्ये भाग घ्यायचाय, पुन्हा खूप माहिती गोळा करायला जाता. पालकांमध्ये चढाओढ सुरू होत की माझ्या मुलाने खूप माहिती गोळा केली की त्याचा पहिला नंबर येईल, पण खूप गुण मिळवले म्हणजे ज्ञान मिळवलं असे नव्हे. मिळवली ती फक्त माहितीच. पण जेव्हा मी ध्यान करायला शिकले तेव्हा असं लक्षात यायला लागलं, ज्ञानाचा स्त्रोत एकच आहे. तो आहे प्रत्येकाच्या आत. माहिती मात्र बाहेरच मिळेल.

ज्ञान मिळेल तेव्हा कुठली माहिती टाकू, कुठली मला उपयुक्त ठरेल

माहिती कुठून, कशी, किती व नेमकी मिळेल याची जाण/विझड्म आपल्यात येतं. तेव्हाच जास्तीची माहिती नाकारता येईल.  आवश्यक तेवढीच माहिती स्विकारली जाईल व मेंदू माहितीचं कोठार न ठरता जास्त सक्षम बनेल. तेव्हा ज्ञानी व्हाल !

आज माहितीलाच ज्ञान समजल्या जातंय व तिथूनच ज्ञानाची माहितीशी फारकत झाली.  आपण इतके अज्ञानी ठरलो की माहितीलाच ज्ञान म्हणू लागलो व जास्तीत जास्त  माहिती मिळवण्याची चढाओढ लागली. पंरतु आजच्या तरूण पिढीला जर हा फरक समजला तर असं वाटतं पुढे होणारं फार मोठं अध:पतन टाळता येईल व अतिशय प्रगल्भ, बुध्दिवान, सृजनशील असं तारूण्य आपल्या हाती येईल व खंरखुरं स्वराज्याचं स्वप्न साकार होईल. तेव्हा विद्यार्थ्यांनो, पालकांनो माहिती व ज्ञान यातील फरक समजावून घ्या व ज्ञानाची मागणी करा माहितीची नव्हे.

एका विद्यार्थ्यांने मला विचारलं, ‘‘ प्रत्यक्ष कृती म्हणजे ज्ञान का ?’’ नाही, तसंही नाही ! जेव्हा नृत्य करता करता तुम्ही इतके रंगून जाता व स्वत:च्या आत शिरता ते ज्ञान. तसंच चित्रकार स्वत:त शिरतो ते ज्ञान. या ज्ञानाची वरची पायरी गाठयची असेल तर या चित्रकाराला, नर्तकाला सुध्दा एका जागी बसून ध्यानस्थ व्हावं लागेल व पायरी-पायरीने, टप्प्या-टप्प्याने ज्ञान मिळवायला लागेल.

ज्ञानाने सळसळता जोम, उत्साह वाढेल, निर्णयशक्ती वाढेल व त्यामुळे चांगलं वाईट यातला फरक समजेल. रत्नपारखी ठराल. सर्व विद्यार्थी हुशार सिध्द होतील व सुखी, स्वस्थ, ज्ञानी, चारीत्र्यसंपन्न असा समाज निर्माण होईल, तेव्हा मागणी करा ज्ञानाची, आस धरा ज्ञानाची. माहिती व ज्ञान यातील फरक स्पष्टपणे समजावून घ्या. ज्ञान कुठे व कसे मिळेल ? कोण देऊ शकेल ? हे प्रश्न विचारा. मगच जीवनाचं पुढचं पाऊल उचला. आधी ज्ञानी व्हा. म्हणजे आज जी ज्ञानाने माहितीशी फारकत घेतलेली दिसते आहे ती न होता खऱ्या अर्थाने  ज्ञानवंत , यशवंत व किर्तीवंत ठराल. कारण ज्ञानाने धरलाय माहितीचा हात.

विद्यार्थांचा, तरूणांचा असा समज आहे की ध्यान हे म्हातारपणी करण्याची

गरज आहे . का ? ध्यानाची खरी गरज तर तरूणांना आहे. या ही पुढे जाऊन असं म्हणता येईल, ज्ञान खंर तर गर्भात असतांनाच मिळायला हवं. आज ठिकठिकाणी Information Technology चा गवगवा आहे. पण Knowledge Technology उभारतांना कुणी दिसत नाही. इथे स्पष्टपणे सांगावे लागेल ज्ञान हे परिपूर्ण आहे त्याला टेक्नालॉजी हा शब्द पण लावता येणार नाही.

माहितीचे स्त्रोत असलेले दुरदर्शन व संगणक यांच्या दुष्परिणामांनी माणसाचे माणूसपणच हरवले आहे. डोकेदुखी, अपचन, नैराश्य इ. नी अगदी तारूण्यालाच घेरले आहे पण तेच ज्ञानाच्या मागे लागाल तर काम, क्रोध, मत्सर यांपासून मुक्त व्हाल. तुमची काम करण्यची शक्ती झपाट्याने वाढेल. पण ज्ञान तुम्हाला पुस्तकातून मिळणार नाही. ज्ञान प्रत्येकाच्या आत दडलय, देवाने प्रत्येकाला ज्ञान प्रदान केलेलच आहे. फक्त त्या ज्ञानावर आपण आपल्या कृतीव्दारे, निरनिराळ्या विकारांव्दारे पडदा टाकलाय. तो दूर करा, ज्ञानी ठराल.

तुमचा पुढचा प्रश्न असणार – कसा सारू पडदा दूर ? मी स्वत: विपश्यनेची साधक आहे. त्यांनी आम्हाला ध्यान कसं करायचं हे शिकवलं, अज्ञानाचा पडदा दूर कसा करायचा हे शिकवलं. ज्ञान कसं मिळवायचं ते शिकवलं आणि आयुष्याचं सोनं झालं.

**माहिती पुसली जाते, ज्ञान हे चिरकाल टिकते, अगदी मेल्यानंतर सुध्दा.**

**शाळांमधून दिलं जावं ते ज्ञान ! दिली जाते ती माहिती !**

गुरूकूल पध्दतीत जेव्हा लेखनकौशल्य अवगत नव्हतं तेव्हा विद्यार्थी घेत होते ते फक्त ज्ञान. आज लेखनकौशल्य अवगत झाल्याबरोबर ज्ञान दूर सारल गेलं व आपण माहितीलाच ज्ञान समजू लागलो. इथेच खरी फसगत झाली व आपली ज्ञानाशी फारकत झाली. आजच्या शाळा ज्ञान प्रदान न करता माहिती प्रदान करतात. तेव्हा असा आग्रह धरा ‘ आम्हाला हवं ज्ञान नको नुसती माहिती’. माहिती आपण आपली मिळवू शकतो.

पण खरंच सांगते, ज्ञान व माहितीतला फरक मी चक्क द्विपदवीधर झाल्यावर

व ध्यानी झाले तेव्हाच मला कळला. जी माझी चूक झाली ती तुमची होऊ नये एवढाच ह्या लेखामागचा उद्देश!

लोकमत सखी, दि. ४ ऑक्टोबर २००७